फोन नं.2647 4892
टेलीफॅक्स नं.2647 1619
romumbai@dtemaharashtra.gov.in
www.jdteromumbai.com

**महाराष्ट्र शासन**

# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

**जागतिक बँक** प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर 49,
**खेरवाडी**, अलियावार जंग मार्ग, वांद्रे(पूर्व) ,मुंबई 51.

---

क्र.. २/विकामुं/तंशि/तांत्रिक- १/२०२२/३३९३ दिनांक : १० ऑक्टोबर,२०२२

**प्रति,**
सर्व प्राचार्य/संचालक,
सर्व व्यावसायिक तांत्रिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्था

विषय : **व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेत नियमबाह्य प्रवेश देऊन शैक्षणिक भ्रष्टाचार केला जात असल्याबाबत**

संदर्भ : मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक २अ/एडीएम/२०२२/३३८, दिनांक १०.१०.२०२२

वरील विषयाबाबत मा. .संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई यांचे संदर्भाधीन परिपत्रक कृपया पहावे. संदर्भाधीन परिपत्रकात नमूद केल्यानुसार विभागातील सर्व व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांना सूचित करण्यात येते की, महाराष्ट्र विनाअनुदानीत खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (पूर्णवेळ व्यावसायिक पदवी पूर्व तांत्रिक पाठयक्रमांच्या प्रवेशांचे विनियमन) नियम २०१७ मधील नियम १३ मधील तरतूदीनुसारच संस्थास्तरीय कोटयातील जागा, अल्पसंख्यांक कोटयातील जागा आणि केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेनंतर रिक्त राहिलेल्या जागांवर प्रवेश प्रक्रिया करावी. तसेच राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,मुंबई यांनी त्यांचे परिपत्रक क्रमांक तंशिप्र-१२२२/प्र.क्र.०६/सीईटी/२०२२/१५८९,दिनांक ३०.९.२०२२ अन्वये दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

**प्रवेशाबाबतचे सक्षम प्राधिकारी हे मा.आयुक्त,राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,मुंबई हे असल्याने प्रवेशासंदर्भात त्यांचेकडून वेळोवेळी देण्यात येणा-या सुचनांचे काटेकोरपणे पालन न करता नियमबाहय पध्दतीने करण्यात आलेल्या प्रवेशांना प्रवेश नियामक प्राधिकरणाकडून मान्यता देण्यात येणार नाही याची गांभीर्याने नोंद घ्यावी.**

(प्रमोद अं. नाईक)
सहसंचालक
तंत्रशिक्षण,विभागीय कार्यालय,मुंबई.

प्रत : मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांना माहितीस्तव अग्रेषित

महाराष्ट्र शासन


# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रं.१९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४५०

ई-मेल – desk2a@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in


क्रमांक: २अ/एडीएम/ २०२२/ ३३८ दिनांक : 10 OCT 2022

प्रति,

सर्व प्राचार्य/संचालक,

सर्व व्यावसायिक तांत्रिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्था

विषय : **व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेत नियमबाह्य प्रवेश देऊन शैक्षणिक भ्रष्टाचार केला जात असल्याबाबत**

संदर्भ : मा.आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,मुंबई यांचे पत्र क्रमांक तंशिप्र/१२२२/ प्र.क्र.३५/प्रनिप्रा/१०२०२, दिनांक ७.१०.२०२२

वरील विषयाबाबत कळविण्यात येते की, महाराष्ट्र विनाअनुदानीत खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (पूर्णवेळ व्यावसायिक पदवी पूर्व तांत्रिक पाठयक्रमांच्या प्रवेशांचे विनियमन) नियम २०१७ च्या पोट नियम १३ तसेच सुधारीत नियमांमध्ये नमूद केल्यानुसार संस्थास्तरीय कोटयातील जागा, अल्पसंख्यांक कोटयातील जागा आणि केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेनंतर रिक्त राहिलेल्या जागांवर प्रवेश विनाअनुदानीत संस्थेतील संचालक किंवा प्राचार्य यांनी प्रवेश प्रक्रिया राबविण्यासाठीची कार्यपध्दती पध्दती निश्चित केलेली आहे.

राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,मुंबई यांनी त्यांना प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील असलेल्या काही संस्था सदर नियमांचे उल्लंघन करुन प्रवेश प्रक्रिया राबवित असल्याचे असल्याचे संदर्भाधीन पत्रान्वये नमूद केले आहे.

याअनुषंगाने तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांना सूचित करण्यात येते की, **महाराष्ट्र विनाअनुदानीत खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (पूर्णवेळ व्यावसायिक पदवी पूर्व तांत्रिक पाठयक्रमांच्या प्रवेशांचे विनियमन) नियम २०१७ मधील नियम १३ मधील तरतूदीनुसारच संस्थास्तरीय कोटयातील जागा, अल्पसंख्यांक कोटयातील जागा आणि केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेनंतर रिक्त राहिलेल्या जागांवर प्रवेश प्रक्रिया करावी. तसेच राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,मुंबई यांनी त्यांचे परिपत्रक क्रमांक तंशिप्र-१२२२/प्र.क्र.०६/सीईटी/२०२२/१५८९,दिनांक ३०.९.२०२२ अन्वये दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.**

**प्रवेशाबाबतचे सक्षम प्राधिकारी हे मा.आयुक्त,राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,मुंबई हे असल्याने प्रवेशासंदर्भात त्यांचेकडून वेळोवेळी देण्यात येणा-या सुचनांचे काटेकोरपणे पालन न करता नियमबाहय पध्दतीने करण्यात आलेल्या प्रवेशांना प्रवेश नियामक प्राधिकरणाकडून मान्यता देण्यात येणार नाही याची गांभीर्याने नोंद घ्यावी.**

( डॉ.अभय वाघ )

संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत : मा.आयुक्त,राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,मुंबई यांना माहितीस्तव व सदर परिपत्रकास आपल्या कार्यालयाच्या संकेतस्थळावरून प्रसिध्दी देण्यात यावी.

प्रत : माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी ----

१) सर्व सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय मुंबई, पुणे,नाशिक,औरंगाबाद,अमरावती व नागपूर त्यांना सूचित करण्यात येते की, आपल्या अधिपत्याखालील सर्व तांत्रिक व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी

अभ्यासक्रमांच्या संस्थांच्या निदर्शनास सदर परिपत्रक आणावे व या बाबतची अंमलबजावणी काटेकोटपणे करावी. तसेच सदर परिपत्रकास विस्तृत प्रसिध्दी आपल्या स्तरावरुन देण्यात यावी.

२) माहिती तंत्रज्ञान कक्ष(कार्यासन क्रमांक ३) मुख्य कार्यालय मुंबई यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक संचालनालयाच्या संकेतस्थळावर ठळकपणे प्रसिध्द करण्यात यावे.

# महाराष्ट्र शासन
## राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई
८ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१.
दूरध्वनी : ०२२-२२०१६१५९ वेबसाईट : http://www.mahacet.org ई-मेल:maharashtra.cetcell@gmail.com


क्र.तंशिप्र-१२२२/प्र.क्र.०६/सीईटी/२०२२/१५८९ दिनांक-३०/०९/२०२२.

## महत्वाची सूचना

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातंर्गत असलेल्या तंत्रशिक्षण विभागातील विविध पदवी व पदव्युत्तर पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया सुरु आहे. सदर प्रवेश प्रक्रियेची तीसरी फेरी संपन्न झाल्यानंतर उर्वरीत राहिलेल्या रिक्त जागा व संस्थास्तरावरील जागांच्या प्रवेश प्रक्रियेसंदर्भात पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेसाठी प्रसिध्द करण्यात आलेल्या माहिती पुस्तिकामधील मुद्या क्रमांक १३ (पदव्युत्तर पदवी माहिती पुस्तिका २०२२-२३ पृष्ठ क्र. २६ आणि २७ व पदवी माहिती पुस्तिका २०२२-२३ पृष्ठ क्र. ३३ ) अन्वये नियम/सुचनांचे तंतोतंत पालन करुन संस्थेने प्रवेश प्रक्रिया राबविण्यात यावी.

वरील परिच्छेदेमध्ये नमूद केलेले पदवी व पदव्युत्तर पदवी प्रवेश प्रक्रियेच्या माहिती पुस्तिकेमधील मुद्या क्रमांक १३ अन्वये नियम / सूचनांचे पालन करणार नाही, अशा महाविद्यालयांवर नियमानुसार कारवाई करण्यात येईल. तसेच प्रवेश प्रक्रिया राबविताना सर्व प्रवेश गुणवत्ता क्रमांकानुसारच देण्यात यावेत व विद्यार्थ्यांनी केलेल्या अर्जांची यादी व त्यांची अंतिम गुणवत्ता यादी (Final Merit List) संस्थेच्या संकेतस्थळावर त्याच दिवशी प्रसिध्द करण्यात यावी आणि सीईटी कक्षाच्या माहितीकरीता सदरील यादी ई-मेलद्वारे पाठवावी.

**सही/-**
**(महेन्द्र ब. वारभुवन)** भा.प्र.से.
**आयुक्त**
**राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**